# तिसरे प्रकरण

## के.सी.उर्फ 'प्रबोधन'कार ठाकरेलिखित

## 'टाकलेलं पोर':वाङ्मयीन चिकित्सा

तिसरे प्रकरण

- के.सी. उर्फ 'प्रबोधन'कार ठाकरेलिखित

# 'टाकलेलं पोर': वाङ्मयीन चिकित्सा.

## ३.१. प्रास्ताविक :

प्रस्तुत तिसऱ्या प्रकरणामध्ये आपण के.सी. ऊर्फ 'प्रबोधन'कार ठाकरेलिखित 'टाकलेलं पोर' ह्या नाटकाची कथानक, संघर्ष, व्यक्तिरेखा, संवाद व भाषाशैली ह्या घटकांच्या अनुषंगाने वाङ्मयीन चिकित्सा करणार आहोत. केशव सीताराम ऊर्फ 'प्रबोधन'कार ठाकरे ह्यांनी स्वतःच आपल्या प्रस्तावनेत पुढील उद्गार काढले आहेत,'' तशातच १९३० साली कर्जत मुक्कामी महाराष्ट्र नाटक मंडळीचा कै. शिवरामपंत परांजपेकृत 'पहिला पांण्डव' नामक नाटकाचा प्रयोग पाहण्याची संधी लाभली..... पण निराशेने नि संतापाने घरी परत आलो. इतक्या अर्कट 'भटी' वृत्तीने कर्णचरित्राची विटंबना शिवरामपंतासारख्या स्वाभिमानी नि स्वदेशाभिमानी माणसाला करवली तरी कशी? याचा अजूनही मला अचंबाच वाटत आहे. त्यातूनच या नाटकाची निर्मिती झाली. 'टाकलेलं पोरं' या नाटकात अपत्यहत्येचा प्रश्न तर प्रधान आहेच आहे, पण त्याहीपेक्षा मागासलेल्या नि पददलित समाजातील स्वाभिमानी उद्धारकांना आत्मोन्नतीचे शिखर गाठण्यासाठी कसकसल्या सामाजिक विकल्पांना नि अडचणींना तोंड देऊन आपला मार्ग आक्रमावा लागतो, याचे दृश्य रंगविण्याचा कर्णाच्या मूळ कथेनुसार मी प्रामाणिक प्रयत्न केला आहे.''

अर्थातच के.सी.ठाकरे यांनी त्या नाटकाच्या रचनेवरून व भाषेवरून ते नाटक शिवरामपंत परांजपे यांचे नसावे असेही नमूद करून ठेवले आहे. ह्या नाटकातील कर्णचरित्राच्या विटंबनेने ठाकरे व्यथित झाले. आणि त्याचा निषेध म्हणून त्यांनी 'टाकलेलं पोर' हे नाटक लिहिले. आपल्या ह्या नाटकाद्वारे त्यांनी आपल्या समाजातील अपत्यहत्येचा प्रश्न समाजासमोर उभा करण्याचा प्रयत्न केला आहे आणि ह्याद्वारे समाजाचे प्रबोधनही करण्याचे कार्य केले आहे.

## ३.२. 'टाकलेलं पोर' चे कथानक :-

सम्राट दुर्योधनाच्या शिबिरामध्ये पहिला प्रवेश सुरू होतो. द्रोणाचार्यांचा वध झालेला आहे. नवीन सेनापती निवडीबाबत चर्चा सुरू आहे. रंगमंचावर शल्य आणि दुर्योधन प्रवेश करतात. शल्याचा पांडवांच्या कपटनीतीबद्दलचा आक्षेप तो दुर्योधनाला सांगतो. युधिष्ठिराच्या अनीतीने वागण्याचा शल्याला राग आलेला आहे. कृष्णाविषयीही त्याच्या मनात राग आहे. शल्य दुर्योधनाला सांगतो, '' हा जो क्षत्रिय संहार चालू आहे, तो या कृष्णामुळेच सुरू आहे. यानेच हे युद्ध पेटवलेले आहे.'' दुर्योधनही शल्याच्याच मताचा आहे. तो पांडवांनी चालवलेले

कृष्णाचे स्तोम व त्यांनी सत्याच्या, धर्माच्या वल्गना करत अधर्मच केला आहे, असे सांगतो. शल्य यावर दुर्योधनाला सांगतो की भीष्माचार्यांना व द्रोणाचार्यांना पांडवांनी अधर्माने मारले. परंतु अश्वत्थाम्याला सोडून कर्णाला सेनापती पद देण्यात दुर्योधनाचे धोरण चुकत आहे. शल्य कर्णाला सेनापती केल्याबद्दल दुर्योधनाला दूषणे देतो. ह्यातून दुर्योधनाची चतुराई दिसत नाही, असे तो म्हणतो. ह्यावर दुर्योधन शल्याला समजावतो की अश्वत्थामा पित्याच्या वधाने क्रोधित झाला असला, तरी त्याचा क्रोध अल्पप्रभावी आहे. त्याचा क्रोध क्षत्रियाप्रमाणे व्यापक व अंतर्मुख नाही ब्राह्मणी पिंडानुसार स्वार्थ साधल्यानंतर त्याचा संतापही कमी होतो व त्याला कोणत्याही कार्याचे महत्त्व वाटत नाही. ह्यासाठी त्याने सेनापतीपदासाठी कर्णाची कौरवांप्रती असणारी बिनतोड निष्ठा लक्षात घेऊन त्याला सेनापती केले आहे. इतक्यात क्रोधाने संतप्त झालेला अश्वत्थामा प्रवेश करतो व कौरवांच्या क्षुद्र मनोवृत्तीचा धिक्कार करतो. दुर्योधन अश्वत्थाम्याला, " तुम्हा सर्वांच्या सहकार्यानेच हे युद्ध सुरू केले आहे, मी कोणालाही कमी लेखत नाही. अश्वत्थाम्याच्या सेनापतीपदाचीही त्याला शंका नाही आणि असणारही नाही"[१], असे सांगतो. पण अश्वत्थामा संतापलेला असल्याने दुर्योधनाचे काहीही ऐकून घ्यायला तयार होत नाही. शेवटी तो दुर्योधनालाच 'छान गुरूभक्ती दाखविलीस!' असे म्हणतो. हा संवाद संपतानाच कर्णाचा प्रवेश होतो. कर्ण अश्वत्थाम्याला, ' यामध्ये गुरूभक्तीचा काहीही संबंध नाही. जिथं सेनापतीच शस्त्रसंन्यासासाठी प्रवृत्त होतो, तिथं इतरांनी काय करावं?" असे विचारतो. अश्वत्थाम्याच्या संतापात अधिकच भर टाकण्याचे काम कर्ण करतो. अश्वत्थामा चिडून म्हणतो," हरामखोरा, माझ्या बापाची निन्दा ? कल्पांत करीन. राजा, या कर्णाच्या टकळीला लगाम घाल."[२] ह्यावर दुर्योधन कर्णाला समजावतो. शल्य लगेच अश्वत्थाम्याची बाजू घेऊन दुर्योधनाला " अश्वत्थाम्याला सेनापती करण्यातच खरे युद्धकौशल्य आहे," असे सांगतो. अश्वत्थामादेखील याच गोष्टीचा आग्रह धरतो. ' मी सर्व पांडवांचा नाश करीन,' असे आश्वासन तो दुर्योधनाला देतो. ह्यावर कर्ण अश्वत्थाम्याच्या जातीवरून त्याची चेष्टा करतो. हे ऐकून शल्य व अश्वत्थामा दोघेही संतापतात. सूतपुत्र, अधमाधम, रथकार, नीच कुलोत्पन्न म्हणून ते कर्णाची अवहेलना करतात. 'पण माझ्या सूतकुलाचा मला अभिमान आहे', असे कर्ण त्यांना सांगतो. तसेच "तुम्ही मला कितीही नावे ठेवलीत तरी स्वयंभू क्षात्रतेजानं या सूतकुलाचा मी उद्धारकच आहे", असे तो त्यांना बजावतो. कर्ण व अश्वत्थामा एकमेकांच्या कुलांना दूषणे देतात. त्यांची वादावादी अशीच वाढत जाते व त्याचे पर्यवसान मारामारीवर येऊन ठेपते. दोघेही एकमेकांवर धावून जातात. ह्यावेळी दुर्योधन आज्ञा देऊन दोघानांही थोपवितो. तरीही अश्वत्थामा कर्णाच्या अंगावर धावून जातो. शल्य अश्वत्थाम्याला राजाज्ञेचा अपमान

करू नकोस, असे सांगतो. त्याचबरोबर भीमाने केलेल्या प्रतिज्ञेचीही तो आठवण करून देतो. कर्ण ''सेनानीपदाचे अधिकार दे अथवा देऊ नको, पण मी अर्जुनाला ठार मारीन किंवा स्वतः मरेन',[३] अशी प्रतिज्ञा करतो. त्यानंतरही अश्वत्थामा आपल्याला सेनापती करण्याची गळ दुर्योधनाला घालतो. दुर्योधन अश्वत्थाम्याला समजावतो. शल्य त्याला दुजोरा देतो व लगेच कर्णाला सेनापती पद बहाल करतो. ह्यावर अश्वत्थामा संतापाने कर्ण सेनापती असे तोवर शस्त्रसंन्यास घेण्याची प्रतिज्ञा करतो. ह्यावर कर्ण ''वडिलांचेच बाळबोध वळण गिरवलेस. यात विशेष काय केलेस? ''[४] असे म्हणून अश्वत्थाम्याला खिजवतो.त्यानंतर अश्वत्थामा रागाने निघून जातो. येथे पहिला प्रवेश संपतो.

दुसरा प्रवेश हिरडा व आवळकटी ह्या विनोदी पात्रांच्या संवादाने सुरू होतो. हिरडा आवळकटीला त्याचे तिच्यावर प्रेम आहे, असे सांगतो. त्यांच्या संवादातून हे महाभारतीय युद्ध द्रौपदीमुळे सुरू झालेले असल्याचे समजते. इतक्यांत बेहडा प्रवेश करतो.हिरडा हा गवई आहे, तर बेहडा हा मृदंग वाजविणारा आहे. बेहडा प्रवेश करताकरताच आपलेही आवळकटीवर प्रेम असल्याचे सांगतो. ह्यामुळे आवळकटीच्या प्रेमावरून दोघांची जुंपते. आवळकटी ते सोडवते. पुढे ह्या तिघांच्या संवादांतून द्रौपदी व कुंती ह्यांच्या पातिव्रत्याची खिल्ली उडवली जाते. तसेच हिरडा व बेहडा यांची लग्ने झाली आहेत, हेही त्यांच्या संवादांतून कळते. हिरडा व बेहडा ह्यांच्या वादाचा तोडगा आवळकटी पुढीलप्रमाणे सांगते,'' अर्जुनवधासाठी कर्ण महाराजांची स्वारी बाहेर पडण्यापूर्वीच आपापल्या कलेनं जो कोणी मनपसंत प्रेमाराधन करील, त्याला मिळेल प्रेमाचा मान. उरेल त्याचा लग्नात अडकवीन कान. आहे की नाही युगत छान ?''[५] शेवटी दोघेही ह्यासाठी तयार होतात.

तिसऱ्या प्रवेशामध्ये बेहडा कर्णाला वासुदेवभटजी भेटायला आल्याचे सांगतो व ते पांडवांच्या छावणीतून आले असल्याचेही सांगतो. कर्ण वासुदेवभटजीला त्याच्या भेटीला येण्याचे कारण विचारतो. वासुदेव भटजी अधर्माला पायबंद ठोकण्यासाठी ब्राह्मणाचा जन्म असल्याचे सांगतो. त्याचबरोबर अश्वत्थाम्याने कर्णाला सूतपुत्र म्हणून हिणवणे, हे स्वतःला रूचले नसल्याचे सांगतात. पण कर्ण स्वतःला त्याचा सूतपुत्र असण्याचा आणि सूतकुलाचा अभिमान असल्याचे सांगतो. ह्यावर वासुदेव भटजी कर्णाला तो पहिला पांडव असल्याचे शपथेवर सांगतात. कर्ण त्यांचे न ऐकता सूतकुलिनत्वाचा अभिमान कणभरही कमी होणार नसल्याचे सांगतो. ह्यावर वासुदेवभटजी भगवान श्रीकृष्णाच्या आज्ञेने कर्णाला त्याचे जन्मरहस्य सांगण्यासाठीच आलो असल्याचे सांगतात. कर्ण वासुदेवभटजींचे ऐकून ते सर्व हसण्यावरी नेतो. कृष्णाला तो नाटकी, चेटक्या असे म्हणतो. कृष्णाची निंदा करतो. वासुदेव भटजी परोपरीने त्याला

समजावतात. पण त्याचा काही उपयोग होत नाही. शेवटी वासुदेव भटजींच्या रूपातील कृष्णाला त्याचे खरे स्वरूप प्रगट करावे लागते. कर्ण स्वतःची शंका खरी ठरल्याचे सांगतो. कृष्ण त्याला त्याचे जन्मरहस्य समजावून देतो. पण तरीही तो ऐकत नाही. कर्ण म्हणतो, " आता कोणी मला कसलीही जबरदस्त भीती घातली, शाप दिले किंवा पृथ्वीदानाची लालूच दाखविली, तरी या प्रेमबंधनाला एक जन्म तरी मला खोटं पाडता येणं शक्य नाही." [६] पुढे कर्ण कृष्णाला असेही सुनावतो की, त्याला मातृपितृद्रोह आणि राजद्रोह दोन्हीही करता येणार नाही. कर्ण स्वतःला शिपाईगडी म्हणवतो व 'रणांगणात मरण येणे, हेच शिपाईगड्याचे व्रत असते, धर्म असतो.' आणि मोक्षही असतो, असे तो कृष्णाला सांगतो. कर्णाच्या सात्त्विक तेजाने आपण स्वतः दिङ्मूढ झालो असे कृष्ण मान्य करतो. पण कर्ण कृष्णाला तसे न होण्याबद्दल विनवतो व शेवटची जिव्हाळ्याची भेट घेतो.

दुसऱ्या अंकातील पहिला प्रवेश हिरडा, बेहडा व आवळकटी ह्यांच्या संवादाने सुरू होतो. आवळकटी हिरडा व बेहडा यांच्या समोर त्यांची जात कोणती, हे सिद्ध करण्यास सांगते. हिरडा, बेहडा व आवळकटी ह्यांच्या संवादात धंद्यावरून जात की जातीवरून धंदा, ह्याबद्दलची चर्चा होते. शेवटी जन्मावरून जात ठरवावी, असे ठरते. पण जन्मावरूनही जात ठरविली जाऊ शकत नाही, असे आवळकटी म्हणते. ह्या तिघांच्या संवादांमधून भीष्माचार्यांचे जन्मरहस्य, द्रोणाचार्यांचे जन्मरहस्य, कृपाचार्यांचे जन्मरहस्य सांगितले आहे. शेवटी जातीच्या उच्चनिचतेपेक्षा पराक्रमावरून श्रेष्ठ कोण, हे ठरवून त्यालाच प्रेमदान करीन, असे आवळकटी सांगते. पण त्यासाठी ती दोघांनाही डोळे बांधून तिची प्रेमयाचना करण्यास सांगते. प्रेमयाचना करताना जो कोणी प्रथम स्पर्श करील, त्याला ती प्रेमदान करणार असल्याचे सांगते. दोघेही प्रेमयाचना करावयास सुरूवात करतात तेव्हा आवळकटी तेथून हुलकावणी देऊन पळ काढते.

दुसऱ्या प्रवेशाची सुरूवात आवळकटी व कर्ण ह्यांच्या संवादाने होते. ह्या संवादांमधून वसुंधरेने कर्णासाठी पुष्पहार आणि पंचारती पाठविल्याचे सूचित होते. तसेच कर्णपुत्र वृषसेन युद्धभूमीकडे गेलेला असल्याचेही समजते. इतक्यात कुंती याचक म्हणून कर्णाकडे येते व पाचही पांडव चिरंजीव राहावेत अशी ती कर्णाकडे याचना करते. कुंती कर्णाला तू सूतपुत्र नसून कुंतीपुत्र आहेस, पहिला पांडव आहेस, असे सांगते. कर्णाला ते पटत नाही. कुंती पुन्हा त्याचे जन्मरहस्य सांगते. दुर्वासमुनींनी दिलेला मंत्र, सूर्यदेवाची प्राप्ती, गर्भसंभव इ. सर्व कर्णाला सांगते. परंतु कर्ण आकाशातल्या चंद्रसूर्याकडून मानवी प्राण्यांना गर्भसंभव होतो, हे मानायलाच तयार नसतो. कर्ण व कुंती ह्यांच्यातील संवादांमधून अपत्यहत्येचा प्रश्न चर्चिला गेला आहे. कर्ण म्हणतो, " लोकांना भिऊन निष्पाप बालकाची प्राणहत्या किंवा भ्रूणहत्या? त्यापेक्षा लोकमान्यतेची हत्या

झाली, तरी बेहत्तर! निसर्गाशी विसंगत असणाऱ्या समाजनियमांना लाथेखाली तुडविण्यातच माणसाची खरी माणुसकी सिद्ध होत असते.'' [१७] कर्ण आणि कुंती ह्यांच्या संवादांमधून अपत्यहत्येच्या प्रश्नाबद्दल समाजाचे प्रबोधन करण्याचा नाटककारांचा हेतू इथे स्पष्ट होतो. कर्ण कुंतीला उलटसुलट बोलून जेरीस आणतो. कुंती स्वतःची चूक कबूल करते व रडू लागते. कर्ण कुंतीची रोखठोक बोलल्याबद्दल क्षमा मागतो. हे सर्व सुरू असतानाच दुर्योधन गुपचूप मागे येऊन उभा राहिलेला असतो. कर्ण- कुंतीचा संवाद ऐकताना दुर्योधानाला कर्ण पांडवांकडे जाईल, अशी भीती वाटते. कर्ण कुंतीला कौरवांशी बेइमानी करणार नाही, पांडवांच्या पक्षात येणार नाही, असे सांगतो. दुर्योधनाच्या विश्वासाशी बेइमान होणार नाही, असेही तो सांगतो. इतक्यात आकाशवाणी होते. पण ही आकाशवाणी कृष्णाने घडवून आणलेली आहे, असे कर्ण समजतो. इतक्यात कृष्ण प्रवेश करतो. कर्ण कृष्णाला हवे तसे बोलतो. कृष्णाला नाटकी, महाठक, दगलबाज, असे म्हणतो. द्रौपदीवस्त्रहरणाला कर्ण भाकडकथा समजतो. बडव्या भगतांनी कृष्णाचे देवबाजीचे प्रस्थ वाढविले आहे, असे तो म्हणतो. कर्ण-कृष्णाचा संवाद सुरू असतानाच शल्याचा प्रवेश होतो. शल्य समरांगणाकडे जाण्यासाठी रथ सिद्ध असल्याचे सांगतो. कुंतीचा आशीर्वाद घेण्यासाठी कर्ण तिच्या पायावर मस्तक ठेवतो. कुंतीचा रणांगणावरील मरणाचा आशीर्वादही त्याच्यासाठी मंगलच असेल, असे तो सांगतो. 'तुझे पाच पांडव जिवंत राहतील अर्जुनासह किंवा कर्णासह.' असे कर्ण कुंतीला वचन देऊन रणक्षेत्री जायला निघतो.

तिसऱ्या अंकातील पहिला प्रवेश हिरडा आणि बेहडा ह्यांच्या संवादाने सुरू होतो. हिरडा बेहड्याला दारूची (मद्याची) महती सांगतो. दोघे एकत्र बसून मद्य पितात. त्या धुंदीतच बेहडा नकुलाच्या आणि वृषसेनाच्या युद्धाचे वर्णन करतो. त्या धुंदीतच हिरडा व बेहडा हे काहीबाही बरळत राहतात.

दुसऱ्या प्रवेशामध्ये कर्ण व शल्य ह्यांचा संवाद आहे. शल्य कर्णाला वृषसेन युद्धात मारला गेल्याची वर्दी देतो. कर्णाला वृषसेनाबद्दल अत्यंत अभिमान वाटतो. शल्य त्याला पुत्रशोक करण्याऐवजी आनंद वाटत असल्याबद्दल दूषणे देतो व ' गर्वाचे घर खाली', ही म्हण ऐकवतो. कर्ण त्याला त्याच्या पायरीप्रमाणे वागण्याचा सल्ला देतो. इतक्यात बाहेर नौबती, शंख, शिंगे वाजलेली ऐकू येतात. कृष्ण कर्णाला युद्धाचे आव्हान देतो. कर्णही शल्याला कृष्णार्जुनाच्या रथाशी आपला रथ भिडवण्याची आज्ञा करतो. शल्य ती आज्ञा मानतो.

तिसऱ्या प्रवेशाची सुरूवात कृष्णार्जुनाच्या संवादाने होते. कृष्ण अर्जुनाला कर्णाच्या पराक्रमाबद्दल सांगत असतो. अर्जुन कृष्णाच्या सारथ्यकर्माची प्रशंसा करतो. कारण कृष्णामुळेच

त्या दिवशी कर्णाच्या हातून सुटलेल्या बाणाचा वेध अर्जुनाच्या शिरकमलाऐवजी किरिटावर होतो. अर्जुनाच्या वधानेच या महायुद्धाचा शेवट झाला असता, पण तो स्वतः आहे तोपर्यंत पांडवाना कशाचीही भीती नाही असे कृष्ण सांगतो. युद्धामध्ये सर्वप्रकारचे डावपेच करावे लागतात. त्यावेळी लौकिक नीतीचा विचार न करता धर्माने-अधर्माने सत्याने-असत्याने अशा कोणत्याही मार्गाने विजय मिळवावा लागतो. कौरवांशी सरळ युद्धामध्ये पांडवांचा टिकाव लागणार नाही. म्हणून शत्रू अडचणीत असतानाच त्याला मारून आपला कार्यभाग साधला पाहिजे. एकदा कार्यभाग उरलकल्यावर मग बरेवाईटपणाची कोणीही चौकशी करत नाही, असे अर्जुनाला सांगून लगेच कृष्ण अर्जुनाचे लक्ष कर्णाकड वेधतो. कर्णाचे रथाचे चाक जमिनीत रूतून बसले आहे, ते काढण्यात तो गर्क आहे, हीच वेळ साधून त्याला बाणाने घायाळ कर, त्याला ठार कर, असे तो सांगतो. पण निःशस्त्र कर्णावर बाण मारला, तर सर्वजण आपली निंदा करतील, अशी भीती अर्जुन बोलून दाखवतो. कृष्ण पुन्हा अर्जुनाला समजावतो व कर्णावर दिव्यास्त्राचा प्रयोग करण्यास सांगतो. अर्जुन कर्णाला आव्हान देतो. कर्ण 'निःशस्त्र शत्रूवर बाण सोडणे, हा अधर्म आहे व असा अधर्म तू करू नको !' असे अर्जुनाला सांगतो. कृष्ण, कौरव पक्षाच्या धर्मा-अधर्माचा पाढाच, कर्णासमोर वाचून दाखवतो. त्यामध्ये कृष्ण द्यूताचा प्रसंग, वारणावतामधील लाक्षागृह, द्रौपदी वस्त्रहरण, चक्रव्यूहामध्ये अडकलेला अभिमन्यू, इत्यादी घटनाप्रसंगांचे दाखले देतो. इतक्यात शल्य रथाचे चाक निघाल्याची सूचना देतो. कर्ण रथारूढ होण्याआधीच कर्णावर दिव्यास्त्र सोडण्याची सूचना कृष्ण अर्जुनाला करतो. अर्जुन दिव्यास्त्र सोडतो. कर्ण घायाळ होतो. ' कर्ण पडला' असा आरडा ओरडा होत असतानाच कुंती त्या ठिकाणी येते. कुंती कृष्णाला कर्ण इतक्यात कसा घायाळ झाला, असे विचारते. शल्य कुंतीला सर्व घटना सांगतो व कृष्णाचा धिक्कार करतो. कुंती शल्याला कर्णाला घेऊन येण्याबद्दल विनवते. कृष्ण कुंतीला त्याच्या ह्या कृतीबद्दल कबुली देतो. कृष्ण म्हणतो, " आत्याबाई, स्पष्ट बोलतो त्याचा राग नका मानू. लौकिकाला न् समाजाच्या विकल्पाना वचकून, पोटचं पोर टाकण्याचा अत्याचार, अखेर केवढा भयंकर परिणाम करतो, हे स्त्रीजातीच्या मातृहृदयी मनावर बिंबवण्यासाठी तुझा अवतार, आणि मागासलेल्या समाजाचा उद्धार करणाऱ्या स्वयंप्रकाशी वीराला किती विरोधांना तोंड देऊन पुढं यावं लागतं, याचा दाखला जगाला पटण्यासाठी या वीरमणि धनुर्धर कर्णाचा अवतार !" [८] कृष्णाच्या ह्या बोलण्यातून नाटककाराने स्वतःचे विचार रसिकांपर्यंत पोहोचविले आहेत. इतक्यात मूर्च्छित कर्णाला सेवक घेऊन येतात. कुंती कर्णाला 'आई' अशी शेवटची हाक मारण्याबद्दल विनवते. कर्ण 'आई' अशी हाक मारून आईच्या अंगावरच मरण्याचे समाधान मानतो. कृष्ण त्याला प्रणिपात करतो. सर्वजण कर्णाचा

जयजयकार करतात.

'टाकलेलं पोर' या प्रबोधनकारांच्या नाटकाचे कथानक साधे आणि सरळ आहे. दुर्योधनासमोर अश्वत्थामा आणि कर्ण यांची झालेली वादावादी इथे वेगळ्या सामाजिक पातळीवर जाताना दिसते. येथे कर्ण हा शूर, पददलितांचा कैवारी म्हणून बोलतो. तर अश्वत्थामा ब्राह्मणाचा कैवार घेऊन बोलणारा गुरूपुत्र आहे. दुर्योधनाने आपल्याला सेनापती पद द्यावे अशी त्याची इच्छा आहे आणि आग्रहही आहे. भीष्म आणि द्रोण यांच्या पक्षपाती वर्तनाला कर्ण दुषणे देतो. तसेच तो अश्वत्थामा आणि द्रोण ह्यांच्या ब्राम्हणी मनोवृत्तीला कडाडून विरोध करतो. अश्वत्थामा तर सूतपुत्र म्हणून कर्णाचा वारंवार निषेध करतो. त्यांच्यातील शाब्दिक कलहाचे शेवटी तलवार घेऊन एकमेकांवर धावण्यात परिवर्तन होते. येथे अश्वत्थाम्याच्या ब्राम्हणी मनोवृत्तीचा, प्रबोधनकार कर्णाच्या मुखातून, निषेध करीत आहेत; असे वाटत राहते. कर्ण आणि अश्वत्थामा ह्यांचे हे भांडण फारच खालच्या पातळीवर गेले आहे असे वाटते. कर्ण-कृष्ण भेट होण्याअगोदर कृष्ण वासुदेवभटजीच्या रूपात कर्णाला भेटतो. त्यावेळी कर्ण कृष्णाची निंदा करतो व त्याचे अवतारित्त्व धुडकाऊन लावतो. याही भेटीत कर्ण आपल्या शौर्याचा अभिमान प्रगट करीत आक्रमकच बनलेला दिसतो. कर्णाच्या सात्विक तेजाने प्रबोधनकारांचा कृष्ण दिङ्मूढ झालेला आहे. कर्णचरित्राला सर्वोच्च बनविण्याच्या प्रयत्नातूनच त्यांच्या लेखणीने घडविलेली ही करामत आहे.

कर्ण-कुंती भेटीमध्ये कुमारी मातेने टाकलेल्या मुलाची चर्चा आली आहे. कुंती लौकिक बंधनांचा, सामाजिक संकेतांचा व सामाजिक रूढींचे आपल्याला पालन करावे लागले असे सांगते तर कर्ण कुमारी मातेने जन्मलेल्या मुलाचे पालनपोषण केले पाहिजे ह्या नैसर्गिक न्यायाचा आग्रह धरतो. सूर्यापासून आपल्याला कर्ण प्राप्ती झाली हे कुंतीचे वचन कर्णाला मान्य होत नाही, हे थोतांड आहे असे तो मानतो. सूर्यासारख्या तेजस्वी युवकापासून कुंतीला पुत्रप्राप्ती झाली असे त्याचे मत आहे. टाकलेल्या मुलाच्या उपेक्षेबद्दल तो मातेलाच जबाबदार धरतो. यावेळी कृष्ण आणि दुर्योधन यांचे मधुनमधुन येऊन आपला अभिप्राय व्यक्त करून जाणे कथानकाला सैल व शिथील बनवताना दिसते. कथानकातील हिरडा, बेहडा आणि आवळकटी यांचे प्रवेश वाचक- प्रेक्षकांच्या मनोरंजनासाठी टाकण्यात आल्याची जाणीव होते. हे प्रवेश मूळ कथानकाशी जुळलेले नाहीत. त्यामुळे कथानकात कच्चेपणा आला आहे. हिरडा हा गवई आहे. बेहडा हा मृदंग्या आहे व ते दोघेही आवळकटीवर प्रेम करत असतात. बेहडा बोलत असताना' ताकिट धाकिट तक् तकधिक ' अशा बोलामध्ये बोलत असतो. हिरडाही गायनातील विविध रागांच्या आलापात बोलत असतो. हे त्यांचे बोलणे केवळ विनोदनिर्मितीसाठी आले

आहे. ह्या संवादांमधील कल्पकता लक्षणीय आहे.

एकंदरीत ह्या नाटकाचे कथानक सामाजिक समस्यांचे चर्चा करणारे व कर्णाला पददलितांचा नेता मानणारे आहे.

## ३.३. 'टाकलेलं पोर'मधील संघर्ष :-

'टाकलेलं पोर' ह्या नाटकातील संघर्षाची ठिणगी पहिल्या प्रवेशापासूनच पडलेली दिसून येते. सेनापतीपदाच्या निवडीवरून हा संघर्ष सुरू होतो. शल्याला कृष्णाच्या कपटनीतीचा तसेच दुर्योधनाच्या कर्णाला सेनापती करण्याच्या निर्णयाचा राग येतो. त्यामुळे तो दुर्योधनाला त्याचा निर्णय चतुराईचा नाही, असे सांगतो. शल्य अश्वत्थाम्याला सेनापती करण्याच्या बाजूचा असतो, तर दुर्योधन कर्णाला सेनापती करण्याच्या बाजूचा असतो. इतक्यात कर्ण व अश्वत्थामा प्रवेशतात. कर्णाच्या व अश्वत्थाम्याच्या संवादांमधून उच्चकुलीन समाज व पददलित मागासलेल्यांचा नेता ह्यांच्यातील संघर्ष दाखविला आहे.

कर्ण-कृष्णाच्या भेटीमध्ये कृष्ण कर्णाला त्याचे जन्मरहस्य सांगतो. पण कर्णाला आपला तेजोभंग करण्यासाठी कृष्णाने हे सांगितले असेल असे वाटते. कर्ण म्हणतो,'' आकाशातल्या चंद्रसूर्यादि ग्रहाकडून पृथ्वीवर मानवी प्रजोत्पादन होऊ शकते, ही कल्पना कवीच्या काव्यातच छान शोभून दिसेल !''[९] तरीही कृष्ण त्याला समजावतो पण कर्ण आपल्या मनातील उच्चकुलिनांविरूद्ध असलेली चिड व्यक्त करतो. त्यातून पददलितांचा नेता म्हणून स्वतःच्या समाजाविषयी असणारा त्याचा अभिमान दिसून येतो. येथेच एक संघर्ष उभा राहतो. कर्ण-कृष्णाच्या संवादातून पुढील महाभारतीय संघर्षाची मुळे घट्ट होताना दिसतात.

कर्ण-कुंती भेटीप्रसंगी कुंती कर्णाला तो पहिला पांडव असल्याबद्दल सांगते. कुंतीच्या मनातील संघर्ष तिच्या संवादांमूधन व्यक्त होतो. कर्ण कुंतीबरोबर संवाद सुरू करतो, तोच मुळी पुढील उपरोधिक शब्दानी,'' या, हा अधिरथ-राधापुत्र कर्ण आपल्याला वंदन करतो.'' कुंतीला कर्णाला कसे समजवावे, हा प्रश्न पडतो. कर्ण उपरोधिकपणाने बोलून कुंतीची हेटाळणी करतो. हा संघर्ष असाच वाढत जातो. शेवटी कुंतीला आपली चूक उमगते, ती म्हणते,'' बाळ बाळ, मी तुझी सर्वस्वी अपराधी आहे, ही जाणीव मरेपर्यंत माझ्या काळजाचे तुकडे तुकडे करीत राहील.''[१०] येथे कर्ण-कुंतीमधील संघर्षाचा उद्रेक झाल्याचा दिसतो. कर्ण हा व्यवहारातील सर्व बाजू कुंतीसमोर रोखठोक मांडतो. ह्या संदर्भात भास्कर गिरधारी म्हणतात.

'' निसर्गधर्म आणि समाजधर्म यातील संघर्षात कर्णाचा आयुष्यभर तेजोभंग होतो आणि कुंतीला ' ते दिव्य मातृहृदय ' गमावल्याचे दुःख वाटत राहते. 'भ्रूणहत्येपक्षा लोकमान्यतेची हत्या बरी', असे कर्णाला वाटते. त्याच्या मनाची घालमेल येथे उत्कटपणे प्रगट झाली आहे.''[११]

कुंतीच्या अपत्यहत्येच्या प्रश्नावरून निर्माण झालेला तिचा मानसिक संघर्ष हा येथे अपत्यहत्येच्या सामाजिक प्रश्नांची प्रातिनिधीक प्रतिमा घेऊन येतो. तसेच लौकिकाच्या स्वार्थासाठी अपत्यहत्या केली, पण लौकिक ही मिळाला नाही व अपत्यही मिळाले नाही, ही खंत कुंतीच्या मनाला लागलेली आहे. कुंतीचा हा मानसिक संघर्ष व कर्ण उच्चकुलिन असूनही आयुष्यभर त्याला मानहानी, हेटाळणी सोसावी लागली, हा कर्णाचा मानसिक संघर्ष हाच नाटकातील संघर्षाला उच्च पातळीवर नेऊन ठेवतो. ह्यामुळे नाटककाराने संपूर्ण नाटकात संघर्षाचा तोल कोठेही ढळू दिलेला नाही, असेच म्हणावेसे वाटते. रसिकांच्या निखळ मनोरंजनासाठी नाटककाराने हिरडा व बेहडा ह्यांचा आवळकटीच्या प्रेमासाठी चाललेला संघर्षही उभा केलेला आहे.

## ३.४. 'टाकलेलं पोर' मधील व्यक्तिरेखा :

### ३.४ १. कर्ण :-

ह्या नाटकातील कर्ण स्वाभिमानी, कुलाचा अभिमान बाळगणारा, मागासलेल्या समाजाचा प्रतिनिधी असलेला, उदार, दिलदार स्वभावाचा, स्वयंभू ज्ञानी असलेला, प्रसंगी भावनाशील होणारा असा आहे. नाटककाराने कर्णाला केंद्रस्थानी ठेवूनच आपले हे नाटक लिहिलेले असल्याने नाटककाराच्या सर्व शक्ती ह्या व्यक्तिरेखेशी एकवटलेल्या दिसून येतात. पहिल्याच प्रसंगात द्रोणाचार्यांच्या वधानंतर सेनापतीपदाच्या निवडीवरून कर्ण व अश्वत्थामा ह्यांच्यामध्ये चांगलीच जुंपते. ह्यामध्ये कर्णाचा स्वाभिमान आपल्याला दिसून येतो. कर्णाचा स्वकुलाचा अभिमान दिसतो. '' क्षत्रियत्त्वाची लटकी घमेंड मारणाऱ्या ब्राम्हणपुत्रा ! सूतपुत्र, सूतपुत्र असा तू माझा कितीही उपहास केलास तरी माझ्या सूतकुलाचा मला मोठा अभिमान वाटत असतो, हे नीट ध्यानात ठेव.'' [१२] '' मी सूतपुत्र आहे आणि स्वयंभू क्षात्रतेजानं मी साऱ्या सूतकुलांचा उद्धारक आहे,'' [१३] ह्या कर्णाच्या उद्‌गारांमधून पददलित समाजाचा स्वाभिमानी उद्धारक म्हणून कर्णाची प्रतिमा उभी राहते.

नाटकामध्ये जागोजागी कर्णाला उदात्ततेचे रूप नाटककाराने दिलेले आहे. ''आत्मविश्वासाच्या मळ्यातच गर्वाचा दवणा दरवळतो. मी आपल्या गर्वाची फेक गगनाला भिडेइतकी उंच भिरकावीन, तेव्हा माझ्या गरीब न् कष्टाळू जातभाईंना थोडासा धीर येऊन ते आपल्या माणुसकीच्या हक्कासाठी धडपडू लागतील,''[१४] '' केवळ मरणाच्या भयानं मी कर्तव्यच्युत होईन, ही कल्पनाच मुळी अस्थानी आहे. बोलून चालून मी शिपाई गडी ! मला मरणाची काय पर्वा? जगानं सुखात जागवं, म्हणूनच शिपाई गडी मरणाला मिठी मारतो. तेच त्याचं व्रत, तोच त्याचा धर्म न् तोच त्याचा मोक्ष ! '' [१५] , '' महाभारतीय युद्धाचा इतिहास जरी कायमचा नष्ट झाला, तरी उदारधी धनुर्धर कर्णाचं चरित्र मागासलेल्या न् पददलित अखिल

मानवजातीच्या उद्धारासाठी आपल्या दैदिप्यमान तेजानं शुक्लेन्दुवत् प्रज्वलितच राहील.''[१६] ह्या कृष्णाच्या उद्‌गारामधून नाटककाराने उदात्त कर्ण उभा केलेला आहे. आपण कष्टकरी, उपेक्षित आणि मागासलेल्या मानवसमुहाचे प्रतिनिधी आहोत नव्हे त्यांचा नेता आहोत अशी इथे कर्णाची भूमिका आहे. तसेच कृष्णाच्या मनोगतातूनही नाटककाराने कर्णाचे अंगीकृत कार्य हेच मानले आहे. कर्ण पददलित समाजाचे नेतृत्व करून त्या समाजाच्या दुःखाना वाचा फोडत राहील. आणि उपेक्षितांना न्याय मिळवून देईल याची त्याला खात्री आहे म्हणूनच महाभारतीय कर्णाला पददलितांचे नेतृत्व देऊन प्रबोधनकारानी कर्णाच्या व्यक्तित्वाला व कर्तृत्वाला सामाजिक आशय बहाल केला आहे. कर्णाच्या व्यक्तित्वातील ह्या सामाजिकतेमुळे त्याच्या व्यक्तित्वाला उदात्तता आली आहे. पददलितांच्या नेत्याच्या रूपात प्रबोधनकारानी कर्णाला इथे उभे केले आहे. प्रबोधनकारांच्या प्रतिभेची व लेखणीची कर्णाच्या व्यक्तित्वाला मिळालेली ही देणगी लक्षणीय व वैशिष्ट्यपूर्ण आहे.

मूळ महाभारतात सर्वांना मार्गदर्शक ठरणारा कृष्णही ह्या नाटकात मात्र कर्णाच्या सात्त्विक तेजाने दिङ्मूढ झालेला दिसून येतो. कर्णाची व्यक्तिरेखा उठावदार करण्यासाठी नाटककाराने हे जाणूनबूजून केलेले असावे. कर्णाला त्याचे जन्मरहस्य सांगून कृष्ण त्याला पांडवांकडे वळविण्याचा प्रयत्न करतो. सर्व पांडव त्याला राजा करून त्याचे पाय धरतील, पांडवपत्नी द्रौपदी ही त्याच्याकडे वर्षातून दोन महिने राहील, अशीही लालुच कृष्ण कर्णाला दाखवतो. पण कर्ण कृष्णाच्या कोणत्याही अमिषाला बळी पडत नाही. शेवटी कृष्ण कर्णाला राजद्रोह करण्याचा सल्ला देतो. परंतु कर्ण त्यालाही जुमानत नाही. ह्यातून कर्णाचा बाणेदारपणा, सत्यनिष्ठा, दुर्योधनाप्रती म्हणजेच कौरवांप्रती असणारी निष्ठा रसिकमनावर ठसवण्यात प्रबोधनकार यशस्वी ठरले आहेत.

कर्ण-कुंती भेटीच्या प्रसंगाला प्रस्तुत नाटकात महत्त्व प्राप्त झालेले आहे. ह्या प्रसंगातील कर्ण पूर्णपणे अलिप्त असल्यासारखा भासत राहतो. कुंती कर्णाला त्याचे जन्मरहस्य सांगते. परंतु हे जन्मरहस्य कर्णाला चमत्कारिक वाटते. '' आकाशातल्या चंद्रसूर्याकडून मानवी प्राण्यांना गर्भसंम्भव होतो, यावर माझा कधीच विश्वास बसणार नाही''[१७], असे कर्ण म्हणतो. कर्ण निसर्गावर विश्वास असणारा आहे. अपत्यहत्या करणाऱ्या स्त्रियांबद्दल त्याच्या मनात अतिशय राग आहे. हा राग त्याच्या वाक्या-वाक्यातून प्रतीत होत रहातो. त्याला जसा राग आहे, तसाच तो भावनाशीलही आहे. कुंतीचे पुत्रप्रमाने ओघळणारे अश्रू त्याला पृथ्वीच्या साम्राज्यातील किरिटापेक्षाही अनमोल वाटतात. कर्णासमोर मित्रप्रेम की बंधुप्रेम, असा पेच उभा राहातो. पण

तरीही तो स्वतःच्या निश्चयापासून तसूभरही ढळत नाही. ह्यातून दृढनिश्चयी कर्ण दिसतो. तो अखेरपर्यंत मित्रप्रेमाखातर लढत राहतो. कुंतीला दिलेल्या वचनाला जागून अखेर स्वतः मृत्यूला कवटाळतो, असा दृढवचनी कर्ण रसिकांसमोर उभा राहतो. येथील कर्ण जसा स्वाभिमानी आहे तसा कणखरही आहे. तो जसा पराक्रमी आहे, तसा भावनोत्कटही आहे. तो दलित नेता आहे तसा ब्राह्मण वृत्तीवर आग पाखडणारा वक्ता आहे. सूर्याचे पितृत्व व श्रीकृष्णाचे अवतारीत्व त्याला मान्य नाही. आपल्या सूतकुलाचा अभिमान बाळगणारा हा कर्ण कर्तृत्वसंपन्न व शूर आहे.

## ३.४.२. कुंती :-

ह्या नाटकामध्ये कुंती आपल्याला प्रथम दुसऱ्या अंकातील दुसऱ्या प्रवेशात भेटते. ह्या ठिकाणी कुंती याचक बनून आलेली आहे. पुत्रप्रेमामुळे ती कर्णाला पहिल्यांदाच त्याचे जन्मरहस्य सांगते. कर्ण जन्मरहस्य ऐकल्यावरही स्तब्ध राहताना दिसतो. त्यामुळे ' म्हणून काय, सख्या पाठच्या भावाच्या वधानं तू आपल्या बीजाशी बेइमान होणार?' ' बीजाशी बेइमान, कुंतिपुत्र कर्णाला तरी शोभणार नाही'[१८], असे कुंती कठोरपणे बोलते. कर्णाच्या व कुंतीच्या संवादांतून कुंतीचे कर्णाबद्दलचे वात्सल्य दिसते. कुंती कर्णाला समाजधर्मामुळे तिने त्याचा त्याग केला, असे सांगते. त्याच्या जन्मावेळी ती अल्लड बालिका होती. फक्त दुर्वासमुनींनी दिलेल्या मंत्राचा प्रत्यय पाहण्यासाठी त्या मंत्राचा तिने उपयोग केला व त्यामुळे कर्णाचा जन्म झाला. पण लौकिकाला काळीमा फासला जाईल, ह्या भीतीने आपण त्याचा त्याग केला, असे सांगते. शेवटी कर्ण कुंतीला अपराधी ठरवतो. ' पटलं, पटलं माझं पाप मला पटलं. लोकनिंदेच्या दराऱ्यापुढे माझ्या बालबुद्धिनं कच खाल्यामुळेच माझ्या हातून हे पाप घडलं.' ' पोटच्या गोळ्याची हत्या करू नये, पण बाळ, मी केली ! मला आता क्षमा कर' 'बाळ, बाळ मी तुझी सर्वस्वी अपराधी आहे. ही जाणीव मरेपर्यंत माझ्या काळजाचे तुकडे-तुकडे करीत राहील'',[१९] अशा उद्गारांमधून कुंतीची अगतिकता, असहाय्यता, पुत्रप्रेमासाठी कासावीस झालेली माता अशी प्रतिमा रसिकांसमोर उभी राहते.

कुंतीच्या व कर्णाच्या माता-पुत्राच्या मनोमीलनाप्रसंगी 'प्रबोधन'कारांनी स्वतःचे विचार समाजप्रबोधन करण्याच्या हेतूने कुंतीच्या तोंडी पुढील प्रमाणे घातलेले दिसतात,

'' लोकलज्जेसाठी पोटच्या गोळ्याची हत्या करणाऱ्या अभागिनींनो या असल्या सौभाग्यासाठी तरी तुमच्या जिवाच्या जिवाला जपा. देवाघरच्या त्या हिऱ्यामाणकाला प्राणाच्या कोंदणात ठेवा.'' [२०]

कुंती-कर्णाच्या भेटीचा प्रसंग नाटककाराने उत्कटपणे रंगविला आहे. ह्यामध्ये कुंती

परिस्थितीमुळे अगतिक होत जाते. पण पुत्रप्रेम तिला गप्प बसू देत नाही. त्यामुळे ती कर्णाला भेटावयाला येते. कर्णाकडून असभ्य व आक्रस्ताळी भाषा ऐकूनही ती निमूटपणे सर्व काही सहन करते. कर्णाला मातृत्त्वाच्या हक्काने पांडवांकडे येण्याबद्दल आज्ञा देते. एकीकडे औरस पुत्रांबद्दलचे प्रेम, दुसरीकडे अनौरस पुत्राची होत असलेली अवहेलना, हे सर्व पाहून कुंती मनोमन आक्रंदून उठते. परंतु औरस पुत्रव अनौरस पुत्र ह्यांना एकत्र आणण्यात ती अपयशी ठरते. तरीही कर्णाचा अधर्माने वध झाला, हे समजल्यावर पुत्राला अंतिम क्षणी समाधानाचे क्षण मिळवून देण्यासाठी ती युद्धभूमीवर येते. ह्यातून पुत्रप्रेमाला आसुसलेल्या कुंतीचे दर्शन घडते. कुंतीमधील हे सर्व गुणच तिच्या व्यक्तिरेखेला उंची देताना दिसतात.

## ३.५. ' टाकलेलं पोर' मधील संवाद व भाषाशैली :-

' टाकलेलं पोर' हे नाटक १९३९ मध्ये 'प्रबोधन'कार ठाकरे ह्यांनी लिहिले. त्या काळाला अनुसरूनच ह्या नाटकातील संवाद आहेत. त्याकाळी अपत्य हत्येचा प्रश्न समाजातील ज्वलंत प्रश्न होता. ह्या प्रश्नाचा धागा पकडूनच नाटककाराने त्याला प्रातिनिधिक रूप देण्याचा प्रयत्न केलेला आहे. कुमारी मातांनी आपल्या मुलाला जन्म देऊन त्याचे निग्रहाने काळजीपूर्वक संगोपन करावे असा विचार इथे प्रबोधनकारांनी मांडला आहे.

संवादामधूनच ह्या नाटकाच्या विषयाचा रोख उलगडत जातो. नाटकाच्या शीर्षकामधून नाटककाराने ह्या नाटकाचा विषय सूचित केलेला आहे. ह्या नाटकातील संवाद उपरोधिक, तसेच सडेतोड पद्धतीचे आहेत. अश्वत्थाम्याच्या संवादांमधून कर्णाच्या कुळाची हेटाळणी व अवहेलना व्यक्त झालेली आहे; तर कर्णाच्या संवादांमधून त्याचा स्वाभिमान, उच्चकुलिनांविषयी असणारी चीड, स्वतःच्या कुलाचा अभिमान, पांडवांबद्दलचा तिरस्कार, दुर्योधनाच्या मित्रत्वाबद्दल असणारा अभिमान, अपत्यहत्या करणाऱ्या मातेबद्दल असणारा संताप इत्यादी विविध भाव व्यक्त झालेले आहेत. कर्ण म्हणतो, '' राजा,वंश कुलाची बेगडी पुण्याई नामर्द षंढांना न् बोलभाण्ड ब्राम्हणांना ! मला नाही ! जन्म न् कुल या अपघाताच्या गोष्टी ! असल्या अपघातांची महति, अश्वत्थाम्या, तुझ्यासारख्या जन्माभिमानी ब्राम्हणाला आणि असल्या भटाब्राम्हणाच्या पोकळ स्तुतिपाठानं फुगणाऱ्या नामधारी क्षत्रियांना! मला नाही. या कर्णाचा पराक्रम न् क्षात्र चरित्र्याची थोरवी, या-या टरारलेल्या मनगटात साठवलेली आहे. क्षत्रियत्वाची लटकी घमेंड मारणाऱ्या बाह्मणपुत्रा, सूतपुत्र, सूतपुत्र असा तू माझा कितीही उपहास केलास, तरी माझ्या सूतकुलाचा मला मोठा अभिमान वाटत असतो, हे नीट ध्यानात ठेव.''[२१] कर्णाच्या उद्‌गारातून त्याचा स्वतःच्या कुलाविषयीचा अभिमान इथे प्रगट होतो. कुळापेक्षा कर्तृत्व मोठे हा विचार इथे मांडला आहे.

संवादांमधून व्यक्तीच्या भावभावना समजतात. ह्या नाटकातही त्याचा चांगल्या पद्धतीने नाटककाराने उपयोग केलेला दिसतो. संवादामधून कर्णाची व्यथा, त्याचा अभिमान; कृष्णाचा खट्याळ, नाटकी, तसेच गंभीर स्वभाव, कुंतीचे पुत्रप्रेम, दुर्योधनाचे मित्रप्रेम, अश्वत्थाम्याचा कर्णाबद्दलचा संताप हे सर्व समजते. पण काही ठिकाणी हे संवाद कथानकाचा वेग मर्यादित करताना दिसतात. दुसऱ्या अंकातील पहिल्या प्रवेशातील व तिसऱ्या अंकातील पहिल्या प्रवेशातील हिरडा व बेहडा ह्यांचे संवाद हे कथानकामध्ये अडथळा आणतात. ह्या नाटकातील संवाद हे सहज, सोपे असले; तरी त्यांचे स्वरूप हे वर्णनात्मक, चर्चात्मक असे आहे. कृष्ण व कर्ण ह्यांचे संवाद हे चर्चात्मक स्वरूपाचे असल्याने ते थोडेसे कंटाळवाणे होताना दिसतात.

तिसऱ्या अंकातील तिसऱ्या प्रवेशात कृष्ण-कर्णाच्या संवादामधून कर्णजीवनातील अनेक घटनांचा उल्लेख होतो. नाटककाराने हे नाटक प्रबोधनाच्या हेतूने लिहिल्यामुळे त्याने संवादांमधून चर्चात्मकतेला प्राधान्य दिलेले आहे. ह्या नाटकामध्ये संवादांमध्येच काही पद्यरचनाही केलेली आहे. नाटकामध्ये संवादातील पद्यरचनांना संगीताची जोड दिल्यामुळे नाटक आणखी चांगले होईल, अशा विचाराने पद्यरचना केल्याचे खुद्द नाटककार प्रस्तावनेत नमूद करतात.

हिरडा, बेहडा व आवळकटी ह्यांच्यातील संवादांचा वापर नाटककाराने विनोदासाठी केलेला असला, तरी त्यातूनही त्याने भीष्म, द्रोणाचार्य, कृपाचार्य ह्यांच्या जन्मरहस्याचा उलगडा करण्याचे कार्य साधलेले आहे. द्रौपदीसाठी महाभारतीय युद्ध लढले गेले हा विचार येथे मांडला गेला आहे. ह्या दुय्यम पात्रांच्या संवादांतून नाटकाचे कथानक अधिक भरदार करण्याचा प्रयत्न प्रबोधनकारांनी केलेला आहे.

संवादांमधून नाटककाराने व्यक्तिचित्रणे साधण्याचा प्रयत्न केलेला आहे. व्यक्तींचे विचार, त्यांचे स्वभाव, त्यांचा दृष्टिकोन हे सर्व काही संवादांमधूनच समजत असते. परंतु प्रस्तुत नाटककाराला ह्यात मात्र म्हणावे तसे यश लाभलेले नाही. कर्ण-कुंती भेटीत कर्णाचा शीघ्रकोपी आणि शीघ्र क्षमाशील असा परस्पर विसंगत स्वभावपैलू दाखविण्याचा प्रयत्न नाटककाराने केलेला आहे. कृष्णाचा खट्याळपणा, तसेच गंभीरपणा हा मात्र यशस्वीपणे नाटककाराने संवादामधून दाखवलेला आहे.

## ३.६. नाट्यसौंदर्य

'टाकलेलं पोर' ह्या नाटकातील कर्ण आणि अश्वत्थामा, कर्ण आणि वासूदेवभटजी तसेच कर्ण आणि कुंती ह्यांच्या संवादांतील धारदारपणा वाचकाचे लक्ष वेधून घेतो. त्यांच्या भाषणांतील वक्तृत्वाचा थाट वेधक आहे. 'उच्चनीचत्वाच्या लौकिकी कल्पना स्वयंभू पराक्रमाच्या विकासाला दडपून टाकतात', 'जाती तशी पुती अन् खाण तशी माती हा सनातन सिद्धांत उर्मट कर्णा विसरू

नकोस', 'जन्मप्राप्त थोरवीवर जगणाऱ्या बड्या बापांच्या बड्या बेटय़ांसाठी हा सिद्धांत निघालेला आहे', ' आकाशातल्या चंद्र सूर्यादि ग्रहाकडून पृथ्वीवर मानवी प्रजोत्पादन होऊ शकते ही कल्पना कवीच्या काव्यातच छान शोभून दिसेल !'[२२] अशा कितीतरी संवादांतून प्रबोधनकारांच्या लेखणीतील विपुल अनुप्रासांची लयबद्धता जाणवत राहते. कर्ण आणि अश्वत्थामा यांच्या संवादातील उपहास आणि उपरोध क्रमाने उंच होत गेलेले आहेत. नाटकातील अश्वत्थामा, दुर्योधन हिरडा आणि आवळकटी ह्यांच्या मुखातील पदे नाटकाला संगीत नाटक करताना दिसतात. पहिल्या अंकातील पहिल्या प्रवेशात अश्वत्थाम्याच्या तोंडी जास्त पदे आहेत.

' राजा आजचि अ-केशव। त्रिभुवन करीन अपाण्डव।
सोमक पांचळांच नाव। शेषमात्र राहील ॥१॥
दाऊनिया शौर्यधाटी। महावीरांचीया थाटी।
संपवीन संग्राम गोष्टी । आजि सर्वां समक्ष ॥२॥'

हे अश्वत्थाम्याने दुर्योधनासमोर काढलेले निश्चयात्मक उद्‌गार पदातून प्रगट झाले आहेत. ही पदे काव्यात्म नाहीत पण त्या त्या व्यक्तींचे मनोगत रोखठोकपणे स्पष्ट करणारी आहेत.

' सूत किंवा सूतपुत्र कोणीतरी असेन मी ॥
दैवाधीन कुली जन्म, मनगटाधीन पौरूष ॥१॥'

कर्णाचे हे पद त्याचे जीवनविषयक तत्त्वज्ञान प्रगट करते.
हिरडा आणि आवळकटी यांच्यातील पदे मात्र त्यांच्यातील प्रणयाच्या छटा व्यक्त करताना दिसतात. त्यांच्या मुखीची पदे सौम्य शृंगारात भिजून निघालेली आहेत.

दुर्योधन, कर्ण आणि अश्वत्थामा ह्यांची पदे वीररसाकडे झुकतात. तर हिरडा आणि आवळकटी ह्यांची पदे सौम्य शृंगाररसाकडे कलताना दिसतात. पहिल्या प्रवेशानंतर मुख्य पात्रांच्या तोंडी पदे नाहीत. म्हणूनच ह्या नाटकाती पदरचनांचा तोल ढळलेला दिसतो. सबंध नाटकभर ही पदे आलेली नसल्याने नाटकाचे संगीतपण कुठेतरी हरवल्यासारखे वाटते.

संवादातील आवेश आणि वक्तृत्वातील जोरकसपणा हे ह्या नाटकाचे खास वैशिष्ट्य आहे.
कर्ण :- वाहवा -वाहवा ! केवढा हा ब्राम्हणी वल्गनांचा गडगडाट ! ब्राम्हणांचं सारं शौर्य जिभलीच्या पट्ट्यात साठवलेलं असतं असं म्हणतात, ते काही खोटं नाही ! बापाला जे पाच दिवसात साधलं नाही, ते हे चिरंजीव एका दिवसांत करून दाखवणार ! ब्राम्हणी धर्मानं असले मुकाबले पार पडते तर क्षात्रधर्माचा जन्मच कशाला झाला असता?''
शल्य :-नीच कुलोत्पन्ना कर्णा, स्वतःच्या पायाखाली काय जळत आहे ते पहा, अन् मग ब्राम्हणांच्या शौर्यवीर्याची चिकित्सा कर.

अश्वत्थामा :- ब्राम्हण मनोवृत्तीची निंदा? राजा ही मला क्षणभरसुद्धा सहन होणार नाही.
दुर्योधन :- अंगराज, भूतकाळाच्या गोष्टीचा नसता वितंडवाद कशाला ? भविष्यकाळाकडे नजर देऊनच वर्तमानकाळाचे कर्तव्य आपल्याला चोख बजावले पाहिजे.
कुंती : -म्हणून काय, सख्ख्या पाठच्या भावाच्या वधानं तू आपल्या बीजाशी बेईमान होणार?
कृष्ण :-माझी जिव्हाळ्याची मसलत तू झुगारून देत आहेस, तेव्हा भावी विनाशकाळ कुणाला टाळता येत नाही, हेच खरं !

त्या त्या व्यक्तींचे हे संवाद त्यांच्या मनातील त्या-त्या क्षणीचे भाव उत्कटपणे व नि:संकोचपणे प्रगट करताना दिसतात. ह्या संवादातील मोकळेपणा आणि धारदारपणा वाचकांचे आणि प्रेक्षकांचे मन वेधून घेताना दिसतो. म्हणूनच हे संवाद वाचकांच्या मनात बाणासारखे घुसताना दिसतात. 'प्रबोधन'कारांचे हे लेखणीचे सामर्थ्य अर्थातच अचाट आहे. अन्यायाविरूद्ध चाड आणि ब्राम्हण वृत्तीबद्दलची चीड त्यांच्या शब्दा शब्दांतून जागोजागी ठिणग्या ओकताना दिसते.

''प्रबोधन'कार यांचा 'टाकलेलं पोर' आपण कुंतीपुत्र किंवा क्षत्रिय आहोत म्हणून मुळीच हुरळून जात नाही उलट उच्च वर्णियत्वाच्या अहंकाराचा तो उपहास करतो. जन्मापेक्षा गुणकर्माने श्रेष्ठ असल्याचा त्याला अधिक अभिमान वाटतो.'' [२२] असे तारा भवाळकर म्हणतात.

ह्या नाट्यकृतीमधील कर्णाची प्रतिमा दलितोद्धारक नेता म्हणून उभी करण्यात नाटककार यशस्वी झाला आहे. जन्मत:च टाकलेल्या मुलाचा सामाजिक प्रश्न त्यांच्या मनाला भिडला म्हणूनच त्यांची लेखणी त्यासाठी जबाबदार असणाऱ्या घटकांवर आग पाखडते. जन्मकुलापेक्षा व्यक्तीचे कर्तृत्व मोलाचे ह्या विचाराचा जोरदार पुरस्कार ठाकरे यांनी येथे केला आहे. नाटककराने उपहास- उपरोधाचे वापरलेले शस्त्र इथे धारधार झाले आहे. कर्णाचा सूर्यापासून जन्म, कृष्णाचे अवतारीत्व ह्या बाबी नाटककारास अविश्वसनीय वाटतात. अशक्य कोटीतील महाभारतातील बाबी येथे नाटककाराने स्पष्टपणे नाकारल्या आहेत. त्यांना वास्तववादी आशय देण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. कर्णाचे कणखर व स्वाभिमानी व्यक्तिचित्र, विनोदनिर्मिती, मध्ये मध्ये संगीत पदांची योजना, सडेतोड व रोखठोक भाषाशैली, आवेशपूर्ण संवाद, समाजप्रबोधनासाठी चर्चा हे या नाटकाचे वैशिष्ट्यपूर्ण वाङ्मयीन विशेष आहेत.

## ३.७. समारोप :-

प्रस्तुत तिसऱ्या प्रकरणामध्ये आपण के.सी. ऊर्फ 'प्रबोधन'कार ठाकरेलिखित 'टाकलेलं पोर' ह्या नाटकाची कथानक, संघर्ष, व्यक्तिरेखा, संवाद व भाषाशैली तसेच नाट्यसौंदर्य ह्या घटकांच्या अनुषंगाने वाङ्मयीन चिकित्सा केली. ह्यामधून आपल्याला खालील निष्कर्ष काढता

येतील:

१. 'टाकलेलं पोर' हे पूर्णपणे सामाजिक प्रश्नाची चर्चा करणारे नाटक आहे. ह्यात कुमारी मातेने टाकलेल्या मुलाच्या प्रश्नाची आणि कुलापेक्षा कर्तृत्त्व श्रेष्ठ ह्या विचारांची आणि दलित नेत्याच्या मार्गातील अडचणींची मिमांसा केलेली आहे.

२. हे नाटक कर्णाची प्रतिमा उजळ करण्याच्या हेतूने नाटककाराने लिहिलेले आहे.

३. शि.म. परांजपेकृत 'पहिला पांडव' ह्या नाटकाची प्रतिक्रिया असे काहीसे प्रतिक्रियात्मक स्वरूप ह्या नाटकाला आलेले आहे.

४. समीक्षकांनी ह्या नाटकाची उपेक्षाच केलेली दिसून येते.

५. कथानकात प्रेक्षकांचा विचार करून मनोरंजनात्मक प्रवेश व प्रसंग घातल्याने नाटकाला काहीशा मर्यादा पडलेल्या आहेत. नाटकाच्या कथानकाच्या गतीला तो अडसर ठरला आहे.

६. नाटकाची भाषा व त्यातील संवाद सडेतोड व रोखठोक आहेत.

***

## ३.८ संदर्भ व टीपा :-


१. पहा: ठाकरे के.सी.; 'टाकलेलं पोर' आयडियल आर्टिस्ट, पुणे प्रथमावृत्तीः

इ.स.१९३९, पृ.५

२. तत्रैव, पृ. ६

३. पहा: तत्रैव, पृ. १२

४. पहा: तत्रैव, पृ. १३

५. '' तत्रैव, पृ. २१

६. '' तत्रैव, पृ. ३०

७. '' तत्रैव, पृ. ५१

८. '' तत्रैव, पृ. ८३

९. '' तत्रैव, पृ. २८

१०. '' तत्रैव, पृ. ५४

११. गिरधारी भास्कर 'कर्ण आणि मराठी प्रतिभा', सविता प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ.

प्रथमावृत्ती १९९३, पृ.४०

१२. उ.नि. १ पृ. ८

१३. पहा.: तत्रैव, पृ. १०

१४. '' तत्रैव, पृ. २६

१५. '' तत्रैव, पृ. ३२

१६. '' तत्रैव, पृ. ८४

१७. पहा.: तत्रैव, पृ. ४८

१८. पहा.: तत्रैव, पृ. ४८

१९. पहा. : तत्रैव, पृ. ५३

२०. '' तत्रैव, पृ. ५७

२१. '' तत्रैव, पृ. ८

२२. '' भवाळकर तारा, 'मराठी नाटक : नव्या दिशा, नवी वळणे', मेहता पब्लिशिंग हाऊस,

पुणे- प्रथमावृत्ती-१९९७. पृष्ठ ४५


■■■■■